**<u>सरतपास फिर्यादीतर्फे विद्वान वकील श्री. एस.आर.कदम यांचेमार्फत शपथेवर सुरु.</u>**

**<u>मी नितीन प्रकाश पुंड, वय – ४२ वर्षे, धंदा - शेती, रा. लिंगीवरे, ता.आटपाडी, जि.सांगली शपथेवर सत्य निवेदन करतो की, माझ्या शपथपत्रातील संपूर्ण मजकूर सत्य व बरोबर आहे व माझ्या सांगण्याप्रमाणे लिहिलेला आहे.</u>**

**१.** आरोपीने आमच्या संस्थेकडे चारा डेपो व्यवस्थापक पदी नेमणुक होणेबाबत दिलेला अर्ज फेरिस्त निशाणी क्र.५८/१ वर दाखल केला आहे. तो मला दाखविण्यात आला. त्यावर आरोपीची, माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. **<u>अर्जास निशाणी क्र.१२७</u>** देण्यात येते.

**२.** फेरिस्त निशाणी क्र. ५८/२ वर दाखल केलेल्या संस्थेच्या ठरावाची प्रत दाखल केलेली आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. **<u>ठरावास निशाणी क्र.१२८</u>** देण्यात येते.

**३.** दिनांक ३०/०९/२०१३ रोजीच्या ठरावाची प्रत दाखल केली आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. **<u>दिनांक ३०/०९/२०१३ रोजीच्या ठरावास निशाणी क्र.१२९</u>** देण्यात येते.

**४.** दिनांक ३१/०७/२०१६ रोजी झालेल्या ठरावाची प्रत फेरिस्त निशाणी क्र.५८/४ वर दाखल केली आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. **<u>दिनांक ३१/०७/२०१६ रोजीच्या ठरावास निशाणी क्र.१३०</u>** देण्यात येते.

**५.** फेरिस्त निशाणी क्र.५८/५ सोबत मूळ प्रोसिडींग बुक(मोठे रजिष्टर) दाखल केलेले आहे. सदर प्रोसिडींग बुकमधील दिनांक ०५/०३/२०१२ ठराव क्र.३ पान क्र.१४ ते १५, दिनांक ०९/०९/२०१२ ठराव क्र.२ पान क्र.२०, दिनांक ०६/१०/२०१२ ठराव क्र.३ पान क्र.२१,

दिनांक ३१/०७/२०१६ ठराव क्र.२ पान क्र.४२ या ठरावामधील मजकूर खरा व बरोबर आहे. या नमूद तारखांमधील ठरावांना **एकत्रात निशाणी क्र.१३१** देण्यात येते.

६. फेरिस्त निशाणी क्र.५८/६ सोबत फिर्यादी संस्थेचे दिनांक ०२/०५/२०१० ते ३०/०९/२०१७ पर्यंतचे मूळ प्रोसिडींग बुक (छोटे रजिष्टर) दाखल केले आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास निशाणी क्र.१३२ देण्यात येते.

**आरोपीतर्फे साक्षीदाराचा शपथेवर उलटतपास विधीज्ञ श्री. ए.डी. वसेकर यांचेमार्फत सुरु.**

७. माऊली स्वयंरोजगार सहकारी संस्थेचे विद्यमान चेअरमन मीच आहे. हे म्हणणे खरे आहे की मी सन २०२५ मध्ये चेअरमन आहे असा दाखविणारा कोणताही कागद या प्रकरणात दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की हे मला आता सांगता येणार नाही की मी संस्थेच्या कोणत्या तारखेच्या कोणत्या निवडणुकीद्वारे चेअरमन म्हणून निवडून आलो होतो. हे म्हणणे खरे आहे की मी विद्यमान चेअरमन असल्याबाबत सहाय्यक सहकारी निबधंक किंवा जिल्हा निबंधक यांचाा कोणताही कागद या प्रकरणात दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की मी जुलै २०२५ मध्ये कधीही फिर्यादी संस्थेचा चेअरमन नव्हतो.

८. हे म्हणणे खरे नाही की मी फिर्याद दाखल करताना चेअरमन होतो असे दाखविणारा सहाय्यक सहकारी निबंधक किंवा जिल्हा निबंधक यांचा कोणताही कागद दाखल केला नाही. साक्षीदाराने आता संचिका पाहून सांगितले की, ऑडीट रिपोर्ट निशाणी क्र.४४ दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की फिर्याद दाखल करताना तसा कागद मी दाखल केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही

की मी फिर्यादी संस्थेचा सन २०१२ पासून ते आजपर्यंत कायदेशरी चेअरमन नाही. हे म्हणणे खरे नाही की फिर्यादी संस्था सद्या कार्यरत नाही. हे म्हणणे खरे नाही की आमचे संचालक मंडळ सद्यस्थितीला कार्यरत नाही. हे म्हणणे खरे नाही की फिर्यादी संस्थेवर सद्या प्रशासकीय मंडळ काम करते. हे म्हणणे खरे नाही की फिर्यादी संस्था औसायनात (मोडकळीस) गेली आहे. हे म्हणणे खरे नाही की फिर्यादी संस्था औसायनात गेल्याबाबत आदेश सहकारी संस्थेकडून फिर्यादी संस्थेस प्राप्त झाले आहेत.

९. फिर्याद दाखल करताना निशाणी क्र. ५८ सोबतची कागदपत्रे दाखल केली होती. हे म्हणणे खरे नाही की माझ्या पूर्वीच्या शपथपत्रामध्ये निशाणी क्र.५८ सोबत दाखल केलेल्या कागदपत्रांचा मजकूर नमूद केलेला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की माझ्या पूर्वीच्या शपथपत्रामध्ये निशाणी क्र.५८ मधील कागदपत्रांचा उल्लेख करण्यास अडचण नव्हती. हे म्हणणे खरे आहे की निशाणी क्र. ५८ सोबत दाखल केलेली कागदपत्रे सहकारी संस्था कायदाच्या उपविधी नुसार संस्थेच्या सचिवाच्या ताब्यात असते. फेरिस्त निशाणी क्र.५८ सोबतची कागदपत्रे मी सचिवांकडून कोणत्या तारखेला घेतली ती निश्चित तारीख मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की निशाणी क्र. ५८ सोबत दाखल केलेल्या कागदपत्रांची उल्लेख लेखापरिक्षण अहवाल मध्ये नाही. हे म्हणणे खरे आहे की निशाणी क्र.५८ सोबत दाखल केलेल्या कागदपत्रावर लेखापरिक्षकाची सही नाही. साक्षीदार सांगतात की मुळ प्रोसिडींगबुकमधील ठराव क्र.१३१ वर सह्या आहेत. परंतु, इतर अर्जावर त्यांच्या सह्या नाहीत. हे मला आठवत नाही की मी निशाणी क्र. १२७ चा कागद लेखापरिक्षकास दाखवला होता किंवा कसे. निशाणी क्र.१२८ चा कागद मी लेखापरिक्षकास दाखवला होता. निशाणी क्र.१२९ ते १३१ ची कागदपत्रे लेखापरिक्षकास दाखवली होती. हे म्हणणे खरे नाही की निशाणी क्र.

१२४ वर दिलेले माझे शपथपत्र मी पुर्वी दिलेला माझ्या पुराव्यातील उणीव भरुन काढण्याकरिता दाखल केले आहे.

**१०.** हे म्हणणे खरे आहे की मी फिर्यादी संस्थेचे सन २०१२ ते २०१३ सालचे आवक–जावक रजिष्टर या प्रकरणात दाखल केलेले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की निशाणी क्र. १२७ च्या अर्जावर कोणताही आवक–जावक क्रमांक नमूद केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की दिनांक ०२/०३/२०१२ रोजीच्या निशाणी क्र. १२७ च्या अर्जाची आमच्या संस्थेतील कोणत्याही आवक–जावक रजिष्टरला नोंद नाही. निशाणी क्र. १२७ चा अर्ज आम्हाला समक्ष प्राप्त झाला होता. हे म्हणणे खरे नाही की निशाणी क्र. १२७ चा आरोपीने कधीही फिर्यादीला संस्थेला दिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की निशाणी क्र. १२७ वर आरोपीची सही नाही. हे म्हणणे खरे नाही की मी माझ्या सोईनुसार निशाणी क्र.१२७ चा अर्ज बोगस तयार करुन आरोपीच्या बोगस सह्या केल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की निशाणी क. १२७ मध्ये चारा डेपो मॅनेजर म्हणून आरोपीची नेमणूक व्हावी म्हणून मी खोटा मजकूर नमूद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की आरोपीने माझ्यासमक्ष निशाणी क्र. १२७ वर सही केली असे माझ्या शपथपत्रात खोटे नमूद केले आहे.

**११.** हे म्हणणे खरे नाही की दिनांक ०१/०४/२०११ ते ३१/०३/२०१२ या काळाची मुळ प्रोसिडींग बुक याकामात दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की पंचकमिटीच्या ठरावानुसार आरोपीची नेमणुक केली होती असा खोटा मजकूर माझ्या शपथपत्रात नमूद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की निशाणी क्र.१२८ चा ठराव खोटा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की ठरावाची नक्कल म्हणून प्रदिप ज्ञानू खटके यांना सही करण्याचा अधिकार नाही. हे मला आठवत नाही की प्रदिप ज्ञानू खटके याची पंच म्हणून नेमणुक

कोणत्या तारखेच्या पंचकमिटीच्या मिटींगमधील ठरावाआधारे झाली होती. हे म्हणणे खरे आहे की प्रदिप ज्ञानू खटके यांनी सचिव महणून नेमणूक होण्याकरिता कोणत्या तारखेला अर्ज संस्थेकडे दाखल केला होता. हे म्हणणे खरे नाही की प्रदिप ज्ञानू खटके यांना सचिव म्हणून काम करण्याची मान्यता सहाय्यक निबंधक किंवा जिल्हा निबंधक यांनी दिलेली नाही. हे मला आठवत नाही की प्रदिप ज्ञानू खटके यांना सचिव म्हणून काम करण्यासंदर्भात सहाय्यक निबंधक किंवा जिल्हा निबंधक म्हणून आदेश दिल्याचा कागद या प्रकरणात दाखल नाही किंवा कसे. साक्षीदार सांगतात या प्रकरणात दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की प्रदिप खटके सचिव आहेत असे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की सन २०१२–१३ साली प्रदिप खटके कधीही आमच्या संस्थेत सचिव म्हणून कार्यरत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की सन २०२५ मध्ये देखील प्रदिप खटके हे फिर्यादी संस्थेचे शासनमान्य सचिव नाहीत.

**१२.** हे म्हणणे खरे आहे की दिनांक ३०/०९/२०१३ ते ३१/०३/२०१४ या काळाचे प्रोसिडींग बुक दाखल केले नाही. हे म्हणणे खरे आहे की मी आज दिनांक ३०/०९/२०१३ ते ३१/०३/२०१४ या काळाचे प्रोसिडींग बुक सोबत आणलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की दिनांक ३०/०९/२०१३ च्या कोणत्या ठरावा क्रमांकाद्वारे चेअरमन व सचिव यांना अधिकार दिले याचा ठराव क्रमांक शपथपत्रात नमूद केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की तसा मजकूर नमूद करण्यास मला अडचण नव्हती. हे म्हणणे खरे नाही की यदिनांक ३०/०९/२०१३ रोजीच्या कोणत्याही ठारावा नुसार मला चेअरमन म्हणून आणि सचिव यांना कोणत्याही प्रतिवर सही करण्याच अधिकारी नाहीत. हे म्हणणे खरे नाही की दिनांक ३०/०९/२०१३ रोजीची ठरावाची नक्कल आमच्या सोईनुसार खोटी व बोगस तयार करुन दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की

निशाणी क.१२८ १२९ आणि १३० सोबत दाखल केलेले ठराव हे माझ्या साईनुसार तयार करुन दाखल केलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की मी दाखल केलेले निशाणी क्र १२८ ते १३० वरील ठराव खोटे व बोगस आहेत. दिनांक ३१/०३/२०१० ते ३१/०३/२०१७ रोजीच्या कोणत्याही ठरावावर पंचकमिटीच्या सह्या घेतल्या नाहीत.

**१३.** हे म्हणणे खरे नाही की सहकार कायद्यानुसार व संस्थेच्या उपविधीप्रमाणे संस्थेला प्रत्येक आर्थिक वर्षाचे स्वतंत्र प्रोसिडींग बुक ठेवणे बंधनकारक असते. हे म्हणणे खरे आहे की प्रोसिडींग बुकवर एकुण पान क्रमांक नमुद करुन त्यावर संस्थेचे चेअरमन आणि सचिव यांच्या सह्या असतात. हे म्हणणे खरे आहे की याकामी दाखल केलेले प्रोसेडिंग बुक हे प्रत्येक वषाचे स्वतंत्र असे नाही. हे म्हणणे खरे नाही की केसला पुष्टी मिळाली म्हणून दाखल केलेले प्रोसिडींग बुक खोटे व बनावट तयार करुन दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की दिनांक ३१/०३/२०१० ते ३१/०३/२०१७ चे दाखल केलेले प्रोसिडींग बुक खोटे व बनावट आहे. हे म्हणणे खरे नाही की प्रोसिडींग बुकमधील ठरावावर सुचक, अनुमोदक यांच्या सह्या खोटया व बनावट आहेत. हे म्हणणे खरे नाही की ठरावामधील ब–याच सह्या मी खोटया केलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की प्रोसिडींग बुक हे सोयीनुसार बोगस तयार केले आहे.

**१४.** हे म्हणणे खरे नाही की पंचकमिटीच्या मिटीगंसंदर्भातील अजेंडा बुक दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की प्रोसिडींग बुकवर शासनमान्यता प्राप्त सचिवाची सही नाही. हे म्हणणे खरे नाही की फौजदारी प्रकरण दाखल करण्यासंदर्भात अगर प्रस्तुतची फिर्याद दाखल करण्यासंदर्भात कोणत्याही पंचकमिटीने कोणताही ठराव पारित केला नाही. हे म्हणणे खरे नाही की या प्रकरणात दाखल केलेले ठरावातील विषय विषयपत्रिकेवर घेवून ठराव पारित

केलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की दिनांक ०२/०५/२०१० ते ३०/०९/२०१७ या काळाचे प्रोसिडींग बुक आमच्या सोयीप्रमाणे तयार केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की  दिनांक ०२/०५/२०१० ते ३०/०९/२०१७ या काळातील प्रोसिडींगच्या दाखल केलेल्या नकला खोटया दाखल केलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की निशाणी क्र.५८ सोबत दाखल केलेले मुळ प्रोसिडींग बुक देखील खोटे दाखल केलेले आहे. हे म्हणणेखरे नाही की निशाणी क्र.५८ सोबत दाखल केलेल्या ठरावाचे इतिवृत्त या प्रकरणात दाखल केलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की निशाणी क्र.५८/१ ते ५८/६ (निशाणी क्र. १२७ ते १३१) वर दाखल केलेले सर्व कागदपत्रे खोटे व बनावट तयार करुन दाखल केलेले आहेत.

**१५.** हे म्हणणे खरे नाही की माझ्या जादा सरतपास निशाणी क्र. १२४ मधील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की उलटतपासातील त्रुटी भरुन काढण्याकरिता जादा पुरावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की ठरावाच्या नकलांवर इतर सदस्यांच्या सह्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की २०१२ ते १३ आणि २०१६ ते १७ या कालावधीत पंचकमिटीत सदस्य कधीही नव्हते. हे म्हणणे खरे नाही की प्रोसिडींग बुकमध्ये ब-याच सदस्यांच्या सह्या मी केलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की खोटे शपथपत्र दाखल करुन आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

समक्ष,

RAHUL BHALCHANDRA KULKARNI

Digitally signed by RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Date: 2025.10.06 16:41:18 +0530

दिनांकः ०६/१०/२०२५
ठिकाणः आटपाडी.

(आर. बी. कुलकर्णी)
सह न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग
आटपाडी